नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १९५ Issue - 195 | वार शुक्रवार दि. ५ डिसेंबर २०२५ Blow- Friday Date 5 December 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# देशाला आपल्या नेतृत्त्वावर अभिमान असला पाहिजे

## नरेंद्र मोदी दबावात येणारे नेते नाहीत ; व्लादिमीर पुतिन यांच्याकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मॉस्को : रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारताच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात भारत आणि रशिया यांच्यातील विविध सामंजस्य करारावर स्वाक्षरी दोन्ही देशांच्या प्रमुखांकडून केली जाऊ शकते. व्लादिमीर पुतिन यांना अमेरिकेनं भारतावर लादलेल्या टॅरिफ संदर्भात विचारण्यात आलं होतं. त्याबाबत पुतिन यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी दबावात येणारे नेते नाहीत, असं ते म्हणाले. अमेरिका टॅरिफच्या माध्यमातून दबाव टाकतेय, का असा प्रश्न पुतिन यांना विचारण्यात आला होता.



भारत दौऱ्यावर येण्यापूर्वी व्लादिमीर पुतिन यांनी इंडिया टुडेला मुलाखत दिली. या मुलाखतीत पुतिन यांना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबतची द्वीप-क्षीय चर्चा आणि भारत- रशियाच्या संबंधांचे भविष्य याबाबत प्रश्न विचारण्यात आले. या मुलाखतीत पुतिन यांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाचं कौतुक केलं. जगानं भारताचं ठाम धोरण पाहिलं आहे. देशाला आपल्या नेतृत्त्वावर अभिमान असला पाहिजे, असं पुतिन म्हणाले. पुतिन यांनी हे देखील सांगितलं की भारत आणि रशियातील ९० टक्क्यांहून अधिक द्वीपक्षीय व्यवहार यशस्वीपणे पूर्ण झाले आहेत.

व्लादिमीर पुतिन यांनी त्यांचे मित्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्यासाठी भारताचा दौरा करत असल्यानं आनंद असल्यचं म्हटलं. पुढील बैठक भारतात आयोजित करण्यास दोन्ही नेत्यांची सहमती असल्याचं देखील त्यांनी सांगितलं.

पुतिन यांनी अनेक गोष्टींवर चर्चा होणार असल्याचं म्हटलं. भारत आणि रशिया यांच्यातील सहकार्याची व्याप्ती मोठी आहे. दोन्ही देशांमधील ऐतिहासिक संबंध देखील त्यांनी अधोरेखित केलं. भारतानं स्वातंत्र्यानंतर केलेल्या प्रगतीचं पुतिन यांनी कौतुक केलं. स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांच्या कमी वेळात भारतानं अद्भुत विकास केल्याचं पुतिन म्हणाले.

व्लादिमीर पुतिन यांनी नऊ वेळा भारताचा दौरा केला आहे. त्यापैकी नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात तीनवेळा (२०१६,२०१८ आणि २०२१) पुतिन भारतात आले. डिसेंबरमध्ये हा त्यांचा दहावा दौरा असेल. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी सातवेळा रशियाच्या दौऱ्यावर गेले आहेत.

व्लादीमीर पुतिन आज राजधानी नवी दिल्लीत सांयकाळी साडे वाजता दाखल होतील. २३ व्या भारत रशिया वार्षिक समिटसाठी पुतिन दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी भारतात येत आहेत. या दौऱ्यात ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत चर्चा करतील. याशिवाय ते राजघाटावर राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना अभिवादन करतील. रशिया यूक्रेन युद्ध सुरु झाल्यानंतर व्लादीमीर पुतिन पहिल्यांदा भारताच्या दौऱ्यावर येत आहेत. ते यापूर्वी डिसेंबर २०२१ ला भारताच्या दौऱ्यावर आले होते.

## निवडणूक आयोगाने संवैधानिक शिस्त पाळली नाही, निवडणुका पुढे ढकलल्यावरुन हायकोर्ट संतप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राज्यातील नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांच्या निकालाची तारीख अचानक पुढे ढकलण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले. तत्पूर्वी, निवडणूक आयोगाने ७२ तासांच्या आधी २४ नगराध्यक्ष आणि १५० पेक्षा जास्त नगरसेवक प्रभागातील निवडणुका पुढे ढकलल्या. त्यामुळे, ऐनवेळी उमेदवारांची आणि कार्यकर्त्यांची गोंधळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळेच, नागपूर खंडपीठीने एकाच निवडणुकीच्या निकालाच्या दोन तारखा मान्य नसल्याचे निदर्शनास आणून देत निकालाची तारीख २१ डिसेंबर करण्यात आली. त्यामुळे, निवडणूक आयोगाचा भोंगळ कारभार समोर आला असून आता उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठानेही निवडणूक आयोगाला चांगलीच तंबी दिली. तसेच, निवडणुका पुढे ढकलल्यावरुन तीव्र नाराजी व्यक्त केली.

उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने राज्य निवडणूक आयोगाला चांगलच झापलं आहे. नगरपालिका तसेच नगरपंचायत निवडणुका अखेरच्या क्षणी लांबणीवर टाकण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयावर तीव्र नाराजी व्यक्त करत हायकोर्टाने खडे बोल सुनावले. मुंबई हायकोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या न्या.विभा कंकणवाडी आणि न्या.हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठापुढे संबंधित याचिकांवर आज सुनावणी झाली. ऐनवेळी निवडणूक लांबणीवर टाकणे टाळता येण्यासारखे होते, आयोगाकडून निवडणुका पुढे ढकलण्याचा झालेला निर्णय योग्य नव्हता, अशा शब्दात उच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला तंबी दिली. अशी कोणतीही आपातकालीन स्थिती नव्हती की, ज्यामुळे निवडणुका लांबणीवर टाकण्यात आल्या. निवडणूक आयोगाने कॅलेंडर पाळायला हवे होते. निवडणूक आयोगाने ७२ तास पूर्वी असा प्रकार करुन प्रशासकीय दूरदृष्टीच्या अभावाचे प्रदर्शन केले आहे आणि असे करताना संवैधानिक शिस्त पाळली नाही, असे गंभीर निरीक्षण हायकोर्टाने नोंदवले.

भविष्यात असे प्रकार नको, गाईडलाईन्स तयार करा

लोकशाहीत निवडणुकीचे वेळापत्रकाचे पावित्र्य पाळणे हे मुलभूत कर्तव्य आहे. निवडणुका लांबणीवर टाकायच्या असतील त्याला भक्कम आधार असणे गरजेचे आहे आणि तसा निर्णय घ्यायचाच असेल तर तो आधी व्हायला हवा, असेही निरीक्षण हायकोर्टाने नोंदवले. तसेच, भविष्यात असे प्रकार होऊ नयेत, म्हणून १० आठवड्यात यासंबंधीच्या गाईडलाईन्स तयार करण्याचे आदेश देखील हायकोर्टाने आयोगाला दिले आहेत. त्यासह, भविष्यात असे प्रकार होऊ नये, अशीही तंबी दिली. त्यामुळे, निवडणूक आयोगाच्या वादग्रस्त निर्णयाने संतप्त झालेल्या राजकीय नेत्यांसह, जनतेसह आता हायकोर्टानेही तीव्र शब्दात निवडणुका आणि निकाल पुढे ढकलण्यासंदर्भाने नाराजी व्यक्त केली.

## डिजिटल ७/१२ : तलाठ्यांच्या सही, स्टॅम्पची झंझट संपली!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्राच्या महसूल विभागात डिजिटल क्रांतीचा महत्त्वपूर्ण टप्पा पार पडला आहे. डिजिटल ७/१२ उताऱ्याला अखेर राज्य सरकारने कायदेशीर मान्यता दिली असून हा निर्णय जाहीर होताच नागरिकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आदेश काढत डिजिटल सातबारा, ८-अ आणि फेरफार उतारे आता पूर्णपणे वैध मानण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी राज्य सरकारने अधिकृत परिपत्रकही जारी केले असून या निर्णयामुळे कोट्यवधी शेतकरी व नागरिकांच्या दैनंदिन कामकाजाला मोठा दिलासा मिळणार आहे.

नवीन नियमांनुसार, नागरिकांना आता केवळ १५ रुपयांचे शुल्क भरून महाभूमी पोर्टलवरून अधिकृत डिजिटल ७/१२ उतारा मिळू शकणार आहे. विशेष म्हणजे या डिजिटल उताऱ्यावर तलाठ्याची स्वाक्षरी किंवा शिक्क्याची आवश्यकता राहणार नाही. डिजिटल स्वाक्षरी, क्यूआर कोड आणि १६ अंकी पडताळणी क्रमांकामुळे हे उतारे स्वतःच कायदेशीरदृष्ट्या वैध ठरणार असून सर्व सरकारी, निमसरकारी, बँकिंग व न्यायालयीन व्यवहारात ते अधिकृत मानले जाणार आहेत.

**फक्त १५ रुपयांत मिळणार डिजिटल ७/१२ उतारा; चंद्रशेखर बावनकुळेंचा मोठा निर्णय**

**डिजीटल ७/१२: नव्या परिपत्रकामुळे अडचणींना पूर्णविराम**

अनेक वर्षांपासून नागरिकांना तलाठी किंवा सज्जा कार्यालयात जाऊन वारंवार चकरा मारून सातबारा मिळवावा लागे. काही ठिकाणी अधिकृत उताऱ्यासाठी चिरीमिरी देण्याच्या तक्रारीही समोर येत असत. या नव्या परिपत्रकामुळे या सर्व अडचणींवर पूर्णविराम लागला आहे. महसूल मंत्री बावनकुळे यांनी गेल्या एका वर्षात महसूल विभागातील अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावल्याने त्यांची कार्यशैली राज्यभर चर्चेत आहे.

डिजिटल सातबाऱ्याला कायदेपंडितांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत असून ही निर्णयप्रक्रिया महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि जमीन महसूल अभिलेख व नोंदवह्या नियम, १९७१ अंतर्गत लागू करण्यात आली आहे. नागरिक आता वळसळींरश्रीरींलरीर. ारहरलहींाळ.सीं.ळप या पोर्टलवर जाऊन डिजिटल पेमेंटद्वारे सातबारा, ८-अ आणि फेरफार उतारे सहज डाउनलोड करू शकतील. संगणकीकृत, डेटाबेस-आधारित आणि डिजिटल स्वाक्षरीयुक्त हे उतारे आता सर्व प्रकारच्या शासकीय कामांसाठी वैध मानले जात असल्याने ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांसाठी हा महत्वपूर्ण दिलासा ठरणार आहे.

## गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना आता डिजिटल स्वरुपात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजने'चा लाभ आता महाडीबीटी पोर्टलमार्फत थेट ऑनलाईन मिळणार असून, शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहोचवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. शेतीत काम करताना होणाऱ्या अपघातांमुळे मृत्यू किंवा अपंगत्व आलेल्या शेतकऱ्यांना ही योजना महत्त्वाची ठरत असून, पूर्वी ऑफलाईन स्वीकारल्या जाणाऱ्या अर्जांची प्रक्रिया आता पूर्णपणे डिजिटल करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतीत काम करताना विविध कारणांमुळे होणाऱ्या अपघातांमुळे शेतकऱ्यांचा मृत्यू किंवा अपंगत्वाच्या घटना राज्यात वारंवार घडतात. अशा घटनांमध्ये शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी म्हणून राज्य सरकार १९ एप्रिल २०२३ पासून गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह योजना राबवत आहे. या योजनेत शेतकऱ्याचा अपघाती मृत्यू झाल्यास २ लाख रुपये तर एक डोळा किंवा एक अवयव कायमस्वरूपी निकामी झाल्यास १ लाख रुपयांची मदत दिली जाते.

पूर्वी या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकरी किंवा वारसदारांना तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सविस्तर प्रस्ताव आणि आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागत होती.

**महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन मिळणार लाभ – कृषिमंत्री दत्तात्रय भरणे**

कागदपत्रांतील त्रुटी, पूर्ततेतील विलंब यामुळे अनुदान देण्यास उशीर होत होता. यावर उपाय म्हणून राज्य शासनाने ही संपूर्ण अर्जप्रक्रिया महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन करण्याचा निर्णय घेतला आहे, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. ऑनलाईन अर्जप्रक्रियेमुळे अपघातग्रस्त शेतकरी किंवा त्यांचे वारसदार घराबाहेर न पडता, त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणावरूनच अर्ज भरू शकतील. अर्जाची सद्यस्थितीही महाडीबीटी पोर्टलवर पाहता येणार आहे. पोर्टलवर अर्ज भरल्यानंतर तो थेट कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांच्या लॉगिनवर जाईल. कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्यास ती दुरुस्त करण्यासाठी संबंधित शेतकरी किंवा वारसदारांना मोबाईलवर एसएमएसद्वारे सूचना मिळणार आहेत. त्यामुळे शासकीय कार्यालयांच्या चकरा न मारता त्रुटी ऑनलाइनच दुरुस्त करता येतील.

**शीतल तेजवानीचा जमिनीच्या गैरव्यवहारात थेट सहभाग असल्याचे स्पष्ट** — **प्रशासनाकडून चौकशी सुरु**

## शीतल तेजवानीला जामीन नाहीच, आणखी ८ दिवस पोलीस कोठडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंढव्यातील ४० एकर जमीन गैरव्यवहार प्रकरणी आरोपी शीतल तेजवानीला पुणे पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य सुत्रधार म्हणून शीतल तेजवानीची याआधी दोन वेळा चौकशी केली होती. चौकशीत उघड झालेल्या बाबींवरून शीतल तेजवानीचा जमिनीच्या गैरव्यवहारात थेट सहभाग असल्याचे स्पष्ट झाल्यावर अटकेची कारवाई करण्यात आली आहे. आरोपी शितल तेजवानीला पुणे कोर्टाकडून आठ दिवस म्हणजे ११ डिसेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

१. सदर महिला आरोपी हिने शासनाचे मालकीची व ताब्यातील ४० एकर जमीन स्वतःचे फायदयाकरीता विक्री केलेली असून सदरचा गुन्हा हा अतिशय गंभीर स्वरुपाचा असल्याने त्याचा तपास करणे आहे.

२. सदर महिला आरोपी हिने सदरची जमीन ही शासनाची असताना ती महार वतन दाखवून बेकायदेशिर रित्या जमीन हस्तगत करण्याकरीता तिची विक्री केलेली असून सदर सर्व गुन्हेगारी कटामध्ये आणखी कोण कोण सामिल आहे? याबाबत तिच्याकडे विचारपूस करून तपास करणे आहे.


३. सदर महिला आरोपी हिने मुळ वतनदार यांचेकडून घेतलेले मुळ पॉवर ऑफ ॲटॉर्नी, मुळ विकसन करारनामे व इतर वेगवेगळे दस्त तिच्याकडून हस्तगत करणे आहे.

४. २७२ मुळ वतनदार यांचे वारस यांना केलेले खरेदी विक्री दस्तामध्ये पैशाची देवाण घेवाण झालेली नसल्याचे दिसत असून त्याबाबत महिला आरोपी हिच्याकडे तपास करणे आहे.

५. सदर प्रकरणी आरोपी महिला यांनी कोणा कोणासोबत पैशाचे व्यवहार केलेले आहे याची सखोल चौकशी करणे आहे.

६. सदर महिला आरोपी हिने जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांचे कार्यालयास दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी केलेले पत्रव्यवहाराचे मुळ कागदपत्र तिच्याकडून हस्तगत करणे आहे.

७. सदर महिला आरोपी हिने शासनाची जमीन ३०० कोटी रुपयांना विक्री केलेली असल्याने सदर गुन्हयाचे गांभीर्य पाहता तिने सदर गुन्हेगारी कृत्य करणे करीता



डिजीटल डिव्हाईल, लॅपटॉप इ. वापरला असल्याची शक्यता असल्याने गुन्हयाचे तपासकामी तिने वापरलेले डिजीटल डिव्हाईस, लॅपटॉप इ. तिच्याकडून जप्त करणे आहे.

८. सदर गुन्हयाची व्याप्ती मोठी असून सदर गुन्हा करताना तिच्या सोबत इतर आणखी लोकांचा सहभाग असण्याची दाट शक्यता आहे. त्याबाबत सहभागी असणारे इतर लोकांची नावे तिच्याकडून हस्तगत करून पुढील तपास करणे आहे.

९. सदर महिला आरोपी हिने केलेले खरेदी विक्री दस्तामध्ये जमिनीची रेडीरेकनर किंमत ३०० कोटी रुपये असल्याचे नमूद केलेले आहे. परंतु, वास्तविक रित्या सध्याचे बाजार भावानुसार सदर जमिनीची किंमत रेडीरेकनर दराचे ४ ते ५ पट जास्त असण्याची शक्यता आहे. त्यामुळे तिने आरोपी कडून रेडीरेकनर दराचे व्यतिरीक्त काही रक्कम घेतली आहे किंवा कसे? याबाबत तिच्याकडे सविस्तर तपास करून पुरावा गोळा करणे आहे.

१०. सदर महिला आरोपी हिने दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे एक पत्र व त्यासोबत ११००० रुपयांचा डी डी जमा केला होता, सदर डी डी जमा करून तिने दिशाभूल करून फसवणूक करण्याचा प्रयत्न केला असून सदर डी डी हा तिने कोणाचे आदेशावरून जमा केला होता, सदर डी डी ची रक्कम ही ११००० रुपये इतकीच का भरली? सदर डी डी भरणे करीता तिने कोणाकडून माहिती घेतली, इतर कोणी तिचे सोबत सहभागी आहे किंवा कसे? याबाबत तिच्याकडे सखोल तपास करणे आहे.

११. सदर महिला आरोपी हिने वर नमूद शासनाचे मालकीची जमीन ही ३०० कोटी रुपयांना खरेदी दस्तानुसार विक्री केलेली आहे. सदर ची रक्कम तिने घेतली आहे का? कोणत्या प्रकारे घेतली आहे? याबाबत तिस विचारपूस करून तपास करणे आहे.

१२. सदर महिला आरोपी हिने सन २०२० ते २०२१ दरम्यान सुध्दा कोणताही आदेश नसताना मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचे कार्यालयास पत्रक देऊन सदर शेतजमीन परत मिळणे करीता सदर जमीनीचा कब्जा हक्क सारा रक्कम किती आहे? ती भरून घ्यावी, असे पत्रक दिलेले आहेत. शासनाचा कोणताही आदेश नसताना ती असे पत्रक देवू शकत नाही. तिने वारंवार असे पत्रक देवून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला असून सदर आरोपी महिलेस त्याबाबत विचारपूस करून तपास करणे आहे.

१३. सदर गुन्हा करण्याच्या कटामध्ये सदर महिला आरोपी हिचे सोबत कोण कोण सामिल आहे, याबाबत तिच्याकडे तपास करणे आहे.

तरी वर नमूद मुद्दयांवर तसेच शासनाचे मालकीचे ४० एकर जमिनीची परस्पर विक्री करून शासनाची फसवणूक केली असल्याने गुन्हयाचे गांभीर्य पाहता सदर महिला आरोपीकडे सखोल तपास करणे असल्याने गुन्हयाचे तपासकामी तिची १४ दिवसांची पोलीस कोठडी रिमांड मिळण्यास विनंती आहे.

## संपादकीय....

# मोदींवर स्तुतीसुमने

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात भारत आणि रशिया यांच्यातील विविध सामंजस्य करारावर स्वाक्षरी दोन्ही देशांच्या प्रमुखांकडून केली जाऊ शकते. व्लादिमीर पुतिन यांना अमेरिकेनं भारतावर लादलेल्या टॅरिफ संदर्भात विचारण्यात आलं होतं. त्याबाबत पुतिन यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी दबावात येणारे नेते नाहीत, असं ते म्हणाले. अमेरिका टॅरिफच्या माध्यमातून दबाव टाकतेय, का असा प्रश्न पुतिन यांना विचारण्यात आला होता. भारत दौऱ्यावर येण्यापूर्वी व्लादिमीर पुतिन यांनी इंडिया टुडेला मुलाखत दिली. या मुलाखतीत पुतिन यांना अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प, पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबतची द्वीपक्षीय चर्चा आणि भारत- रशियाच्या संबंधांचे भविष्य याबाबत प्रश्न विचारण्यात आले. या मुलाखतीत पुतिन यांनी नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाचं कौतुक केलं. जगानं भारताचं ठाम धोरण पाहिलं आहे. देशाला आपल्या नेतृत्त्वावर अभिमान असला पाहिजे, असं पुतिन म्हणाले. पुतिन यांनी हे देखील सांगितलं की भारत आणि रशियातील ९० टक्क्यांहून अधिक द्वीपक्षीय व्यवहार यशस्वीपणे पूर्ण झाले आहेत. व्लादिमीर पुतिन यांनी त्यांचे मित्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्यासाठी भारताचा दौरा करत असल्यानं आनंद असल्यचं म्हटलं. पुढील बैठक भारतात आयोजित करण्यास दोन्ही नेत्यांची सहमती असल्याचं देखील त्यांनी सांगितलं. पुतिन यांनी अनेक गोष्टींवर चर्चा होणार असल्याचं म्हटलं. भारत आणि रशिया यांच्यातील सहकार्याची व्याप्ती मोठी आहे. दोन्ही देशांमधील ऐतिहासिक संबंध देखील त्यांनी अधोरेखित केलं. भारतानं स्वातंत्र्यानंतर केलेल्या प्रगतीचं पुतिन यांनी कौतुक केलं. स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांच्या कमी वेळात भारतानं अद्भुत विकास केल्याचं पुतिन म्हणाले. व्लादिमीर पुतिन यांनी नऊ वेळा भारताचा दौरा केला आहे. त्यापैकी नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात तीनवेळा (२०१६,२०१८ आणि २०२१) पुतिन भारतात आले. डिसेंबरमध्ये हा त्यांचा दहावा दौरा असेल. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी सातवेळा रशियाच्या दौऱ्यावर गेले आहेत.

# पडघे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले होते पाणी सत्याग्रह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आमच्या आयुष्याचं केलं सोनं
देहाचे झिजून केले चंदन...
ज्ञानाच्या महासागराला
अंतःकरणातून कोटी, कोटी वंदन...

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वांचे प्रेरणास्थान आहेत.

महाराष्ट्र म्हटला तर डोळ्यासमोर पुरोगामी महाराष्ट्र उभा राहतो. या महाराष्टखूप ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे आणि तो वारसा येथील महानायक आणि महानायिका यांच्यामुळे. महाराष्ट्र मधील जिल्हे असो, की तालुके किंवा खेडे पण कुठेतरी ऐतिहासिक बाबी आढळतीलच, असाच ऐतिहासिक वारसा लाभलेला ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच पदस्पर्श लाभलेलं गाव म्हणजे पडघे....

पडघे अनेक खेडे गावांचा एक आर्थिक उलाढाल आणि महत्त्वाचा केंद्रबिंदू बनला आहे. निसर्गरम्य आणि भिवंडी तालुक्याच्या कुशीत वसलेल्या पडघे गावाला ह्या संविधानाचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व , विश्वरत्न,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पदस्पर्श लाभले. ही पडघे गावासाठी अभिमानस्पद बाब ठरली आहे. आणि ही एक न पुसता येणारी ऐतिहासिक सोनेरी रेषा आहे. आज मला अभिमान वाटतो की ,मी या पडघे गावच्या मातीत जन्माला आलो खरंच, आज मन भरून येत आहे, अनेक पिढ्यांच्या जीवनाचे सोनं करणारा घटनासम्राट ह्या मातीत आला आणि मातीच आज सोनं करून गेला. नवतरुणाममध्ये एक चैतन्य निर्माण करणारी ही घटना आहे. प्रत्येकाच्या हृदयावर कोरणारी ही घटना आहे. सर्वांच्या मनात एक घर करणारी ,अभिमानास्पद घटना आहे. पडघे गावातील प्रत्येक नागरिकाला अभिमान वाटणारी ही घटना आहे. आम्ही ज्या गावात राहतो त्या गावांमध्ये घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर भिवंडी तालुक्यातील पडघे या गावात आले होते. पडघे समतानगर येथील जेष्ठ नागरिकांकडून ऐतिहासिक दाखले नेहमीच मिळत असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आले होते, असा त्यांच्या आठवणींना त्यांच्याकडून उजाळा मिळतो.



ठाणे जिल्ह्यातील आणि भिवंडी तालुक्यातील पडघे हे गाव शिव, फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीचे केंद्रबिंदू म्हटले जाते. या पडघे गावातून अनेक सामाजिक कार्यकर्ते घडले. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती महोत्सव २५ गावे पडघे विभाग आयोजित क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्याकरिता पडघे परिसरातील अनेक युवा सामाजिक कार्यकर्ते एकत्र आले आणि मोठ्या जोमाने काम करू लागले. क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती पडघे विभागातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन १९९०-१९९१ काळात महात्मा ज्योतिबा फुले स्मृती दिनानिमित्त शताब्दी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी निमित्त क्रांतीसुर्य, प्रज्ञासूर्य यांची जयंती पडघे विभागात सूरू झाली सुरू केली. त्यावेळी नामवंत साहित्यिक सामाजिक कार्यकर्त्यांना पडघे येथे जयंती निमित्त प्रबोधनासाठी बोलावण्यात आलं होते. कार्यक्रमासाठी २५ गावे एकत्र येतात. हळूहळू हा संयुक्त जयंती साजरी करण्याचा वारसा तरुणांनी हाती घेतला आहे. तर विविध सामाजिक उपक्रम नवतरुण राबवत आहेत. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील पडघे येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भेट दिली होती आणि पाणी सत्याग्रहही केला होता. चहा , पाणी घेतले होते. त्या आठवणीला पडघ्यातील नागरिक नेहमीच उजाळा देत असतात.

आम्ही लहान होतो, तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पडघ्यात आले होते.सतीच्या विहिरीवर पाणी सत्याग्रह केला होता. त्यांच्यासोबत अनेक कार्यकर्त होते.पडघा येथिल एका शिसवीच्या झाडाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सभा झाली होती,मुलांना तुमच्या शिक्षण द्या असे डॉ. बाबासाहेबांनी सभेमध्ये नागरिकांना संबोधित केले होते . समतानगर येथील काशिनाथ हाशाबा दोंदे यांच्या घरी चहापाण्यासाठी थांबले होते . पडघे परिसरात ही बातमी तेव्हा वाऱ्यासारखी पसरली होती .अशी आठवण समतानगर येथील आजी हिराबाई दुंदांजी सोनावणे ( वय ९५ ) यांनी माझ्याशी बोलताना सांगितली आहे.

पडघे ,समतानगर येथिल दिवंगत हाशाबा दोंदे हे त्या काळातील एक सामाजिक कार्यकर्ते होते.काशिनाथ दोंदे हे आरटीओ मध्ये अधिकारी होते. समतानगर गावातील एकमेव जमीनदार आणि त्यांचे समतानगर येथील घर म्हणजे मोठे घर म्हणून प्रसिद्ध आणि त्या घरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चहा,पाणी घेतला होता,समतानगर येथे देखील दोंदे परिवाराच्या घराला त्यांच पदस्पर्श लाभले असून, समतानगर मधी देखील दोंदे कुटूंबाच्या मोठे घर येथे डॉ.बाबासाहेबांच्या पाऊलखुणा सापडतात.

पडघे येथिल जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते शरद रामचंद्र साने (वय ७९ ) गेल्या वीस वर्षांपासून सतीची विहीर वाचविण्यासाठी , संवर्धनासाठी प्रयत्न करीत आहेत त्यासाठी ते नेहमीच संघर्ष करीत आहेत. सतीच्या विहिरी संदर्भात अनेक कागदपत्रे त्यांनी आज पर्यंत सांभाळून ठेवली आहेत.

पडघे हा एक ऐतिहासिक वारसा लाभलेला गाव आहे. डॉ. बाबासाहेबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पडघे येथील सतीची विहीर साक्ष देत आहे. जेव्हा ही घटना आम्ही पुस्तकामध्ये वाचतो तेव्हा आमच्या तरुण कार्यकर्त्यांना काम करण्याची ऊर्जा मिळते. ज्या महामानवाने या भारत देशाची राज्यघटना लिहिली. असा घटनाकार एका खेड्या गावामध्ये पाण्यासाठी सत्याग्रह करतात. समतानगर येथे येऊन दोंदे कुटुंबाकडे चहा पाणी घेतात. त्याच गावात आम्ही राहतो तर आम्हाला येथील प्रत्येक नागरिकाला नक्कीच या गोष्टीचा अभिमान वाटतो.आणि आमचं मन अभिमानाने फुलून येतं . अनेक पुढारी होऊन गेले. अनेक पुढारी निर्माण होतील. त्यामध्ये नक्कीच प्रत्येकाच्या ओठावर असणार नाव म्हणजे घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर....

क्रांती निर्माण करण्यासाठी
सारे एक होऊनी घेऊया शपथ...
डॉ. बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी
पुढे नेऊया समतेच्या चळवळीचा रथ...

**लेखक – मिलिंद सुरेश जाधव**
**पडघा, भिवंडी मो.**
**८६५५५६९४३६**

# बार्टीच्यावतीने महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमी येथे सवलतीच्या दरात ग्रंथ विक्रीचा स्टॉल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमी दादर येथे देशातील अनेक राज्यातून लाखोच्या संख्येने भीम अनुयायी येत असतात.

डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने विविध प्रबोधनात्मक, कार्यक्रमाद्वारे महामानवास अभिवादन करण्यात येणार आहे.

सामाजिक न्याय मंत्री ना. संजय शिरसाठ, सामाजिक न्याय विभागाने प्रधान सचिव डॉ हर्षदिप कांबळे, बार्टीचे महासंचालक सुनील वारे, यांच्या मार्गदर्शनाखाली महापरिनिर्वाण दिनी संपूर्ण राज्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करून अभिवादन करण्यात येणार आहे राज्यभरातील समतादुतांच्या मार्फत अभिवादन कार्यक्रम होईल.

यंदाचे वर्ष हे भारतीय संविधानाचे अमृत महोत्सवी वर्ष असून बार्टीच्या वतिने राज्यात संविधान जनजागृतीही केल्या जाणार आहे. शिवाजी पार्क परिसरात पाच व सहा डिसेंबर रोजी

बार्टी पुस्तक स्टॉलवर सवलतीच्या दरात डॉ बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथ, भारताचे संविधान, जनता, बुद्ध आणि त्यांचा धम्म, द प्रॉब्लेम ऑफ रुपी, शासकीय खंड, तसेच अन्य महापुरुषांचे मौल्यवान ग्रंथ भीम अनुयायांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

बार्टीची ग्रंथ संपदा ही सवलतीच्या दरात व दर्जेदार असल्यामुळे राज्यातील वाचकांची पसंती ही प्रथम बार्टीच्या स्टॉलला असते.

भीम अनुयायांसाठी बार्टीच्या वतीने शिवाजी पार्क मैदानात दिनांक ५, ६ डिसेंबर रोजी मोफत भोजन, पिण्याचे पाणी वाटप करण्यात येणार असुन अनुयायांनी बार्टी पुस्तक स्टॉल कक्ष , भोजन वाटप कक्ष स्थळी भेट देऊन बार्टीच्या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहान महासंचालक सुनील वारे, बार्टीचे निबंधक विशाल लोंढे, विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड यांनी केले आहे.

# अक्कलकोटची रोहिणी उणदे युपीएससीमध्ये चमकली; गावात आनंदाचे वातावरण!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट – मौजे किरनळीची रोहिणी इरण्णा उणदे हिने युपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होत Indian Railway Management Service (IRMS) मध्ये नाव नोंदवले आहे. स्थानिक पातळीवरून राष्ट्रीय प्रशासन सेवेत पोहोचलेले तिचे हे यश अक्कलकोट तालुक्यासाठी अभिमानाचा क्षण ठरले आहे.




रोहिणीचे वडील इरण्णा उणदे हे पुणे जिल्हा परिषदेत ग्रामविकास अधिकारी आहेत. कुटुंबाची साधी पार्श्वभूमी, सातत्य, शिस्त आणि स्वतःवरचा विश्वास – या मिश्रणातून रोहिणीने ही मोठी झेप घेतली.

तिच्या निवडीची बातमी समजताच गावात आणि परिसरात आनंदाचे वातावरण असून, उणदे कुटुंबावर अभिनंदनांचा वर्षाव सुरू आहे.

# भारतीय नौदल दिवस

खरंतर भारतीय नौदल दिवस हा भारत-पाक युध्दाच्या स्मृतीत साजरा केला जातो. भारतीय नौदलाला एक प्राचिन वारसा आहे. पण अलिकडील काळात तीनशे वर्षांपूर्वी ज्या दुरदृष्टी ने थोरल्या महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी सागरी किल्ल्यांची जी मालिका उभारली त्याला तोड नाही.प्रत्येक जलदुर्ग हा सामरीक दृष्टीने एका पेक्षा दुसरा वेगळा आहे. एका किल्ल्याचा संरक्षण प्रकार दुसर्या किल्ल्याला पुनरावृत्ती झालेला नाही. कुलाबा किल्ल्याच्या ओहोटीचा प्रकार असेल तर विजयदुर्ग ची पाण्यातील संरक्षण भिंत असेल प्रत्येक दुर्गांची संरक्षण रचना वेगळी.




हे स्थापत्य वैभव प्रत्यक्षात उतरविण्यारे युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज हेही एकमेवच.

**– किरण आ खराडे**

# शिरवळवाडी येथील महसूल अधिकारी यांची मनमानीपणा; प्रत्येक कामासाठी पैशाची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी

शिरवळवाडी व सदलापूर तालुका अक्कलकोट येथील महसूल अधिकारी दिगंबर आंदेलवाड यांच्या उद्धट व व अर्थपूर्ण व्यवहारामुळे येथील सर्वसामान्य शेतकऱ्यांचे गैरसोय व हाल होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. शेतकऱ्यांच्या कामात कामचुकार व टाळाटाळ करून शेतकऱ्यांना ताटकळवून ठेवून त्यांच्याकडे पैशाची मागणी करत आहे. नवीन नोंद धरण्यासाठी तीन ते पाच हजार रुपयांची मागणी करत आहे. वारसा नोंदणी करणे, नवीन खरेदी विक्री व्यवहाराची दस्त नोंद करण्यास पाच ते दहा हजार रुपयाची मागणी करत आहे. ज्या शेतकऱ्यांना अतिवृष्टीचे पैसे आले नाहीत त्यांचा केवायसी करण्यासाठी व तसेच फार्मर आयडी अप्रोल करून देतो म्हणून कित्येक शेतकऱ्याकडून पाचशे ते हजार रुपयाची मागणी होत आहे. ज्या शेतकरी त्यांच्या बरोबर अर्थपूर्ण व्यवहार करत आहेत त्या शेतकऱ्यांचे काम होत आहे. व इतर शेतकऱ्यांना ताटकळत ठेवत असल्याची तक्रार शेतकऱ्यातून होत आहे. शिरवळ वाडी व सदलापूर हे नेमणुकीचे गाव असून सुद्धा दोन दोन महिने पर्यंत या गावांना भेट देत नसल्याची चित्र दिसून येत आहे. कामाचे ठिकाण सोडून अक्कलकोट येथे भाड्याची खोली घेऊन तेथेच कार्यालय बनवला आहे. दोन दोन महिने गावांना भेट देत नसल्यामुळे गावातील अनेक शेतकऱ्यांचे कामे अडकून पडले आहेत. अतिवृष्टीची पंचनामा करताना जाणून बुजून अनेक शेतकऱ्यांना लाभा मिळवून देताना शेतकऱ्याकडे खूप मोठ्या प्रमाणात पैशाची मागणी झाली आहे जे शेतकरी त्यांच्याबरोबर अर्थपूर्ण व्यवहार केले आहेत त्यांना जास्त लाभ मिळवून दिला आहे. तर जे शेतकरी पैशाची पूर्तता केली नाही त्यांना एकतर वगळण्यात आला आहे किंवा अत्यल्प कमी लाभ मिळून दिला आहे. अशी तक्रार शेतकरी वर्गातून होत आहे. याशिवाय एखादा किरकोळ दाखला उतारा यासाठी शेतकऱ्यांना वारंवार अक्कलकोटला चकरा मारायला लावत आहे. एखादा सुशिक्षित शेतकऱ्यांनी मोबाईल वर संपर्क साधला असता त्यांच्याशी उद्धटपणाची भाषा वापर करून तुम्हाला कुठे जायचं तिथे जावा काय करायचं ते करा अशा भाषेत उत्तर देत आहे. मला शासकीय कामे आहेत मिटींग आहे. मी सध्या नाही अशी कारणे सांगून शेतकऱ्यांना भेटणे टाळात आहे. शिरवळवाडी व सदलापूर येथील भ्रष्ट महसूल अधिकारी दिगंबर आंदेलवाड याची त्वरित बदली करावी व त्याच्यावर कायदेशीर कारवाई अशी मागणी शिरवळवाडी व सदलापूर येथील शेतकऱ्यांतून होत आहे. माननीय तहसीलदार यांनी या भ्रष्ट महसूल अधिकारी दिगंबर आंदेलवाड यास वेळीच लगाम घालावी. व त्याच्यावर कायदेशीर कारवाई करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा शिरवळवाडी व सदलापूर येथील ग्रामस्थांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

### शेतकऱ्यांशी उद्धटपणाने वर्तणूक



**शिरवळवाडी येथील महसूल अधिकारी दिगंबर आंदेलवाड हे प्रत्येक कामासाठी शेतकऱ्याकडे पैशाची मागणी करत आहे. जे शेतकरी पैशाची पूर्तता करतील त्याचेच काम करतो बाकीच्या शेतकऱ्यांना हेलपटे मारायला लावतो खरेदी दस्ताची नोंद करण्यासाठी पाच ते सहा हजार रुपयाची मागणी करत आहे. अतिवृष्टी मध्ये सुद्धा शेतकऱ्यांना लुटला आहे. कामाच्या ठिकाणी कधीच येत नसतो मोबाईलवर संपर्क केले तर मोबाईल उचलत नाही उचलला तर शेतकऱ्याबरोबर उद्धटपणे बोलतो व बे जबाबदारीचे उत्तर देतो अशा या भ्रष्ट व कामचुकार महसूल अधिकारी दिगंबर आंदेलवाड यांची चौकशी करून याच्यावर तहसीलदार यांनी योग्य ती कारवाई करावी**

**– सोन्या बापू शिरगापुरे (शेतकरी, शिरवळ वाडी)**

# आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरणा तर्फे कायदेविषयक जनजागृती शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शक निर्देशानुसार आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर व एन ए बी संचलित निवासी अंध कार्यशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांगासाठी कायदेविषयक जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.




शिबिरात मार्गदर्शन करताना लोकभीरक्षक देवयानी किणगी यांनी सांगितले की, दिव्यांग व्यक्ती अधिनियम २०१६ अंतर्गत दिव्यांग व्यक्तींना शिक्षण, रोजगार, आरोग्य, सामाजिक सुरक्षा, आरक्षण व सन्मानाने जगण्याचा अधिकार कायद्याने प्राप्त झाला आहे. शासकीय कार्यालये, शाळा, रुग्णालये व सार्वजनिक ठिकाणी सुगमतेच्या सुविधा देणे बंधनकारक असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. तसेच दिव्यांग व्यक्तींवर होणारा भेदभाव, छळ अथवा हक्कांपासून वंचित ठेवण्याचे प्रकार हे शिक्षेस पात्र गुन्हे असल्याची माहिती दिली.

लोकभीरक्षक शिवकैलास झुरळे यांनी दिव्यांग व्यक्तींना मिळणाऱ्या विविध शासकीय योजना, प्रवास सवलत, शैक्षणिक व रोजगार सवलती यासंदर्भातही सविस्तर मार्गदर्शन केले.

शिबिरात उपस्थित दिव्यांग प्रशिक्षणार्थींनी आपल्या अडचणी व प्रश्न मांडले. प्रश्नोत्तर सत्रात कायदेविषयक तज्ञ देवयानी किणगी, शिवकैलास झुरळे, अनुराधा कदम यांनी योग्य कायदेशीर उपाय सुचवले. तसेच गरजू दिव्यांग व्यक्तींना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मार्फत मोफत कायदेशीर मदत उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली.

या प्रसंगी व्यासपीठावर अंकुश कदम, रामचंद्र कुलकर्णी, लोकभीरक्षक देवयानी किणगी, अनुराधा कदम, शिवकैलास झूरळे, स्वप्नील मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. येवेळी विधिज्ञा अनुराधा कदम, स्वप्नील मोरे व दिव्यांगानी मनोगत व्यक्त केले.

या शिबिराच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींमध्ये कायदेविषयक जागरूकता वाढवणे, त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे व आत्मविश्वास निर्माण करणे हा उद्देश यशस्वीरीत्या साध्य झाला, अशी भावना एन. ए बी संचलित निवासी अंध कार्यशाळा केंद्राचेमुख्य रामचंद्र कुलकर्णी यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश श्री मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनी व एन ए बी संचलित निवासी अंध कार्यशाळे चे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. अशी माहिती अधिक्षक जिल्हा विधी सेवा प्राधिकरण एस.ए.जी. नदाफ यांनी दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ऊर्जा क्षेत्रात 'एआय' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून पर्यावरणपूरक शाश्वत विकासाची सुरूवात : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## अमेरिकेच्या 'द रॉकफेलर फाउंडेशन', 'ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट' व ऊर्जा विभाग यांच्या सहकार्यातून उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात सौर ऊर्जेसह नवीनीकृत ऊर्जा स्त्रोतांच्या 'डिजिटल ट्वीन' पद्धतीच्या माध्यमातून वीज वितरण व्यवस्था मजबूत करण्यात येणार आहे. महावितरणमध्ये आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहभागातून कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (एआय ) आधारित डिजिटायझेशन उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे 'एआय' तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्रात पर्यावरणपूरक शाश्वत आर्थिक विकासाची सुरूवात होत असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) 'द रॉकफेलर फाउंडेशन- आरएफ', 'ग्लोबल एनर्जी अलायन्स फॉर पीपल अँड प्लॅनेट-जीईएपीपी' आणि ऊर्जा विभाग यांच्या सहकार्यातून कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (एआय) आधारित डिजिटायझेशन उपक्रम राबविणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमेरिकेतील रॉकफेलर फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. राजीव शाह यांची यावर्षी जानेवारीमध्ये यासंदर्भात चर्चा झाली. यामध्ये वीज वितरण प्रणालीमध्ये डिजिटल ट्वीन वापर करण्याची अतिशय नाविन्यपूर्ण संकल्पना पुढे आली. ऊर्जा विभागही मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे असून त्यांनी महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्राच्या दृष्टीने हा क्रांतिकारी निर्णय घेतला.

आरएफ आणि जीईएपीपीसारख्या संस्थांच्या सहकार्यातून अत्याधुनिक एआय आधारित जागतिक दर्जाचा प्लॅटफॉर्म हा देशातील इतर वीज कंपन्यांसाठी आदर्श ठरेल, वीज वितरण क्षेत्रातील कंपन्यासाठी हा एक आदर्श मानदंड असेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

रॉकफेलरचे अध्यक्ष डॉ. शाह यांच्या प्रतिसादाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे. ग्राहक सेवा उन्नत करण्याकरिता आणि कालांतराने महावितरणला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याकरिता

### महावितरणमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान (एआय ) आधारित डिजिटायझेशन

एआय-आधारित निर्णय-सहाय्यक साधने अत्यंत उपयुक्त आहेत. महावितरण कंपनीसाठी विकसित होणाऱ्या उपाययोजना वीज वितरण क्षेत्रातील दीर्घकालीन, शाश्वत आणि परिणामकारक सहाय्यभूत असतील, असा दृढ विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

वीज वितरणमध्ये 'डिजिटल ट्वीन' पद्धती विकसित करण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. नाविन्यपूर्ण एआय -आधारित उपक्रमातून शाश्वत पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर वाढण्यासाठी ग्रामीण भागात मोठे बदल होतील.

डिजिटायझेशन उपक्रम : महाराष्ट्रातील वाटचाल

महाराष्ट्रातील ग्रामीण भागांतील शेतकरी आणि वीज ग्राहक यांना या नवीन डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून अधिक विश्वसनीय व विजेची सहज उपलब्धता मिळणार आहे. जागतिक स्तरावरील ए आय तंत्रज्ञान व ऊर्जा क्षेत्रातील थेट भागीदारीच्या मदतीने, महाराष्ट्रात प्रगत डिजिटल प्रणाली लागू होइल. ज्यामुळे वीज प्रवाहाची अचूकता, क्षेत्रीय काम काज, आणि ऊर्जा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम होणार आहे.

या उपक्रमामध्ये, वीज नेटवर्कचे डिजिटल मॉडेल तयार केले जात आहे जेणेकरून वीज प्रवाहाचे विश्लेषण, ग्रीडची ऑप्टिमायझेशन, वीज आउटेज नियोजन, नवीनीकृत ऊर्जा स्त्रोतांचे (आरई) अधिक चांगले समायोजन होईल. विद्युत वाहिन्यांच्या देखभालीसाठी अधिक जागरूक नियोजन तसेच शेतकऱ्यांसाठी सौर उर्जा वापर यासाठी ही कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणाली काम करेल.

ही डिजिटल प्रणाली महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (एमएसईडीसीएल) मध्ये लागू केली जात आहे, ज्यामुळे सध्या अस्तित्वात असलेल्या तांत्रिक किचकट अडचणी दूर होण्याची ही सुरवात आहे.

**हरित ऊर्जा प्रणालीकडे स्वयंपूर्ण कार्यक्षम वाटचाल संधी**

ऊर्जा क्षेत्रावर हे बदल मोठे परिणाम करणार आहे, असे ऊर्जा विभागाने म्हटले आहे. या डिजिटल रूपांतरणामुळे प्रकल्प व्यवस्थापनात जलद निर्णय घेता येतात. यामुळे ग्रीडच्या कार्यक्षमतेत वाढ झाली असून, सौर ऊर्जा अधिक प्रमाणात उपयोगात आली आहे. या हरित ऊर्जा वापराने प्रदूषणात मोठी घट होणार आहे. या नव्या प्रणालीमुळे विद्युत वितरणामध्ये कमीत कमी एक टक्का जरी वीज गळती घटली तरी वर्षाला सुमारे १०००-१५०० कोटी रुपयांची बचत होऊन नुकसानीत मोठी घट होणार आहे.




**राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्त्व**

उपक्रमात जागतिक सहभागामुळे याप्रकारच्या डिजिटल उपाययोजना, विशेषतः भारतासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या देशांत, वीजविषयक स्थिरता, अखंड उपलब्धता व ग्रामीण भागांत विद्युत सेवांची गुणवत्ता सुधारण्यात महत्त्वाचा बदल ठरू शकतो. भारतात वीज वितरण व्यवस्थेत एआय डिजिटल प्रणाली वापराचा महत्त्वपूर्ण प्रयत्न होत असून, आधुनिक भारताला शाश्वत स्वयंपूर्ण, पर्यावरणपूरक कार्यक्षम ऊर्जा प्रणालीची गरज आहे. या उपक्रमामुळे यात योगदान देण्याची संधी महाराष्ट्राला प्राप्त झाली आहे.

**ऊर्जा क्षेत्रात नवे युग**

कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) व डिजिटायझेशनच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (महावितरण) ऊर्जा क्षेत्राचे आधुनिकीकरण करणार आहे. महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्रात नवे युग सुरू होणार आहे.

**उपक्रमाचे मुख्य उद्दिष्टे**

- वीज प्रवाह, ग्रीड ऑप्टिमायझेशन, आणि नूतनीकरणीय ऊर्जेचे एकत्रीकरण अधिक प्रभावी होणार.
- ग्राहक सेवा आणि वितरण कार्यक्षमता सुधारून आर्थिक सक्षमता साध्य घेणार.
- महाराष्ट्रातील संपूर्ण वीज वितरण विद्युत वाहिन्यांच्या देखभाल व नियोजनात सुधारणा घेणार.

**ग्रामीण ग्राहक व शेतकऱ्यांना लाभ**

या नवीन डिजिटल प्रणालीमुळे सौर ऊर्जेचा वापर वाढवता येईल, शेतकऱ्यांना व ग्रामीण भागातील ग्राहकांना अधिक विश्वसनीय आणि अखंड वीजपुरवठा मिळेल.

**आर्थिक व पर्यावरणीय परिणाम**

- वीज वितरणातील दरवर्षी सुमारे ₹१०००-१५०० कोटींची बचत.
- हरित ऊर्जा वापर वाढल्याने प्रदूषणात घट.

# 'अज्ञानात जगू नका, योग्य ज्ञान आणि माहिती हीच खरी ढाल' : डॉ. राजीव प्रधान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : एड्स हा आजार असल्यापेक्षा त्याबद्दलची अज्ञानता हीच सर्वात मोठी भीती आहे. माहितीच्या अभावामुळेच भिती, गैरसमज आणि भेदभाव निर्माण होतो. त्यामुळे योग्य वैज्ञानिक ज्ञान व माहिती, सुरक्षित वर्तन, समुपदेशन आणि तपासणी याबाबत समाजात खुल्या पद्धतीने संवाद व्हावा, हीच आजची गरज आहे. यातूनच एड्स रोखणे आणि नियंत्रीत ठेवणे पूर्णपणे शक्य आहे असे प्रतिपादन इंडियन रेड क्रॉस सोसायटी सोलापूरचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान यांनी केले.



रयत शिक्षण संस्थेच्या लक्ष्मीबाई भाऊराव पाटील महिला महाविद्यालयात जागतिक एड्स दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखा आणि लायन्स क्लब ऑफ सोलापूर सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रबोधनपर व्याख्यानात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे होते. व्यासपीठावर डॉ. श्रीकांत येळेगावकर, स्वामीनाथ कलशेट्टी, सुगतरत्न गायकवाड, दिनानाथ धुळम यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. प्रधान यांनी युवकांसमोरील वाढत्या आरोग्य समस्या, एचआयव्ही संसर्ग कसा होतो, कसा होत नाही, प्रतिबंधात्मक उपाय, चाचणीचे महत्त्व, गर्भवती महिलांसाठी होणारे उपचार, तसेच एड्सग्रस्त व्यक्तींशी सामाजिक स्वीकाराची गरज याबाबत मार्गदर्शन केले. एचआयव्ही पॉझिटिव्ह व्यक्तीही योग्य औषधोपचार आणि काळजी घेऊन दीर्घ व सामान्य जीवन जगू शकतात असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### 'एल.बी.पी.एम.' महाविद्यालयात जागतिक एड्स दिनानिमित्त प्रबोधनपर व्याख्यान

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. सुरेश ढेरे म्हणले की, आरोग्य ही जीवनाची मुलभूत गरज आहे. त्यामुळे याबाबतची जागृती हीच खऱ्या अर्थाने शिक्षणाची दुसरी बाजू आहे. समाजात एड्सबाबतीतील प्रबोधन होण्यासाठी विद्यार्थिनींनी जबाबदार नागरिक म्हणून हा संदेश पुढे नेणे आवश्यक आहे.

कार्यक्रमाचेप्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. अनिल कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. ऐश्वर्या ढेपे यांनी केले. तर आभार सुगतरत्न गायकवाड यांनी मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. किशोर पवार, प्रा. संतोष मारकवाड, प्रा. दिपाली सातपुते यांची उपस्थिती होती. नियाज शेख, लता रोमन यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# सखी मतदान केंद्रावर महिला मतदान अधिकाऱ्यांनी मतदानाची जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

मा.राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता निवडणूक कार्यक्रम घोषित केलेल्या वेळेनुसार दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी नगर परिषद निवडणूक मतदान यशस्वीरित्या पार पडले.

नगर परिषद सिंदखेड राजा निवडणुकीमध्ये मा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली सिंदखेड राजा येथे आदर्श सखी मतदान केंद्र स्थापन करण्यात आले होते.

सिंदखेडराजा नगर परिषद निवडणुकीमध्ये एकूण २१ मतदान केंद्रे होते, त्यामधील प्रभाग क्रमांक ७ मध्ये मतदान केंद्र क्रमांक ७/१ साठी दिनांक २ डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मतदानासाठी आदर्श सखी मतदान केंद्र सज्ज करण्यात आले होते. हे आदर्श सखी मतदान केंद्र महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय सिंदखेड राजा येथे हे मतदान केंद्र होते, या मतदान केंद्रावर एकूण ३१५




स्त्री आणि ३५३ पुरुष असे मिळून एकूण ६६८ मतदारांची येथे नोंद होती, त्यापैकी एकूण ५८५ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला, म्हणजेच या सखी मतदान केंद्रावर विक्रमी असे ८७.५७% मतदान यशस्वीरित्या पार पडले.

विशेष बाब म्हणजे मतदान केंद्र क्रमांक ७/१ आणि ७/२ या दोन्ही केंद्रावर सायंकाळी ५ नंतर विक्रमी गर्दी ची रांग लागली होती, रात्री ८:३० वाजता मतदान प्रक्रिया पूर्ण झाली होती. या पथकामध्ये मतदान केंद्राध्यक्ष म्हणून सुरेखा रामराव बडे यांनी दिलेली जबाबदारी उत्तमपने पार पाडली, सोबतीला सुवर्णा त्र्यंबक चौरे,ज्योत्सना कैलासराव देशमुख,योगिता ब्रिजलाल राठोड यांनी मतदान अधिकारी म्हणून जबाबदारी पार पाडली. मतदान केंद्राध्यक्ष म्हणून मिळाली जबाबदारी पार पाडण्यासाठी सुरेखा रामराव बडे तसेच सर्व मतदान अधिकारी महिला यांची ही निवडणूकीची पहिलीच ड्युटी होती, त्यामुळे त्या सर्व जणी थोड्याशा गोंधळलेल्या अवस्थेत होत्या त्यावेळी त्यांना मा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे साहेबांनी त्यांना महत्त्वाचे मार्गदर्शन करून त्यांचे मनोबल वाढवले आणि त्यांना तुम्ही ही जबाबदारी यशस्वी रित्या पार पाडचाल याचा विश्वास दाखवला, आणि घडले हे तसेच या सर्व महिला भगिनींनी त्यांना दिलेली कर्तव्य अगदी चोखपणे आणि यशस्वीरित्या आणि विक्रमी पद्धतीने ८७.५७% मतदान घेऊन दाखवले. या सखी मतदान केंद्राच्या सर्व टीमचे मा.निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे साहेबांनी कौतुक केले त्यावेळी शेवटी मतदान केंद्राध्यक्ष सुरेखा रामराव बडे यांनी साहेबांचे आभार मानले.

## ऊस उत्पादकांची लाखोंची लूट

### अचानक तपासणी तंत्रज्ञानाचा वापर पारदर्शक व तौलणिक व्यवस्था हीच काळाची गरज

# साखर कारखान्याच्या वजन काट्यावर प्रश्नचिन्ह!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील साखर कारखाने ऊस तोडणी प्रक्रियेत पारदर्शकता राखतात का? वजन काटे खरोखरच शाबूत आहेत काय? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संबंधित विभागाकडून केली जाणारी तपासणी प्रामाणिक होते की केवळ कागदपत्रीच? हा प्रश्न ऊस हंगाम सुरू होताच हजारो शेतकऱ्यांच्या मनात पुन्हा डोकावू लागला आहे.

ऊस तोडणी प्रक्रियेत किलो दोन किलो नव्हे तर क्विंटलच्या हिशोबाने फरक असल्याच्या तक्रारी गेले अनेक वर्ष शेतकरी करीत आहेत. अनेक कारखान्यावर वजन काटे हेतू पुरस्कार हलके ठेवले जातात, ट्रॅक्टर ट्रॉली फडावर पोचल्यावर चढवलेले वजन कमी दाखवले जाते, अशा आरोपाची साखळी कायम आहे.

तपासणी विभागाची कार्यपद्धती शंका कायम! साखर कारखान्यातील वजन काटे की तपासणी कायद्याने दरवर्षी अनिवार्य असली तरी प्रत्यक्षात ती किती काटेकोर होते, हा प्रश्न कायमचा दुमसत राहिला आहे. तपासणी नोटीस आधीच कारखान्यांना दिली जाते वजन काटे तपासणी वेळी सेट केले जाते त्या काही वेळ अधिकारी व कारखाना व्यवस्थापनपनातील मिली बघत असल्याचा शंका शेतकऱ्यांचा आरोप आहे.

तपासणी दिवसापूर्वीच काटेकोर पुढचे दीडशे दिवस कारखान्याचे मनमानी करता, कारखान्याची स्पष्टीकरण सर्व प्रक्रिया कायदेशीर कारखान्याच्या व्यवस्थापनाचा दावा आहे की सर्व वजन का ते स्टँडर्ड मशीनने तपासले जातात आणि हॉर्न संसार कॅमेरे यास अत्याधुनिक यंत्रणा बसवलेले आहेत तोंडलिक प्रक्रियेत फसवणूक शक्यता नाही, असे त्यांचे म्हणणे परंतु तरीही प्रत्यक्षात तोडणी व्हिडिओ शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याचे आश्वासन अद्यापही पूर्ण झालेली नाही. शेतकऱ्यांची संघटनेची मागणी तपासणी विभागाची अचानक धाड तपासणी करावी प्रत्येक वजन काट्यावर २४X७सीसीटीव्ही आणि ऑनलाईन लाईव्ह स्ट्रीमिंग तोडणी प्रक्रियेत शेतकरी प्रतिनिधी बंधनकारक उपस्थिती फरक आढळल्यास कारखान्यावर कोथरूड दंड आणि परवाना व वृद्धीची कारवाई काही ठिकाणी घडलेली प्रकार सोलापूर जिल्ह्यातील मागील तीन हंगामात काही कारखान्यावर वजनात फरक आढळून आली कारवाई झाली होती मात्र ही कारवाई शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी सख्या नेमकी अशी भावना व्यक्त केली जाते.



तपासणीची विश्वासार्थता अजूनही प्रश्नचिन्हात साखर कारखान्याच्या ऊस वजन काट्याची तपासणी कागदावर काटेकोर, प्रत्यक्षात मात्र प्रश्नांकित अशीच परिस्थिती असल्यास विरोध शेतकरी सातत्याने करीत आहेत.

शेतकऱ्यांचा विश्वास जिंकण्यासाठी अचानक तपासणी तंत्रज्ञानाचा वापर पारदर्शक व तौलणिक व्यवस्था हीच काळाची गरज असल्याचे तज्ञा जमत आहे कारखान्याकडून वजन काट्यावर गैरप्रकार होत असताना मुख्यमंत्र्यांनी आजपर्यंत दुर्लक्ष केल्याने मुख्यमंत्री सहायता निधीला साखर कारखान्यांना प्रति टन शेतकऱ्यांचा विश्वास जिंकण्यासाठी अचानक तपासणी तज्ञाचा वापर पारदर्शक व तौलिक व्यवस्था हीच काळाची गरज असल्याचे तज्ञ गंमत आहेत कारखान्याकडून वजन काट्यावर गैरप्रकार होत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी आजपर्यंत दुर्लक्ष केल्याने मुख्यमंत्री सहायता निधीला साखर कारखान्यांना प्रति टन दहा रुपये, व पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी प्रति टन पाच रुपये कपात करण्याचा अधिक काढलेले होता व या आदेशाने साखर कारखान्यांनी विरोध केल्यानंतर मुख्यमंत्री साखर असताना दबाव आणण्यासाठी साखर कारखाने उसाच्या वजनात काटंबरी करत असल्याचे व्यक्त केले होते मग कारखान्यातील वजन काट्यावरची तपासणी का होत नाही सोलापूर जिल्ह्यातील आजपर्यंतची किती साखर कारखाने वजनकाठी दुसरी आढळलेले आहेत किती साखर आयोगाने कारवाई झाली आहे ही सर्व प्रश्नांची उत्तरे निराजनक मिळत आहेत तसेच खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत यापूर्वी कारखान्याने काटामारी करत नव्हती का? परंतु कारखानदारी मुख्यमंत्री सहायता निधीला विरोध केल्यानंतर मुख्यमंत्री जागे झालेले आहे त्यांनी बोललेले शब्द खरा करून दाखवावा कारवाई करताना सत्ताधाऱ्याच्या कारखान्याला अभय देऊ नका विरोधकाच्या कारखान्याला जाणीवपूर्वक कारवाई करू नका तरच उसाच्या वजन काटा मारी होणार नाही ही शेतकऱ्यांच्या खऱ्या अर्थाने न्याय मिळेल.

# बाबा ग्रुप फाऊंडेशनच्या वतीने लोनाड येथे आरोग्य शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत बाबा ग्रुप फाऊंडेशनच्या वतीने भिवंडी तालुक्यातील लोनाड येथे आरोग्य तपासणी शिबिर व नेत्र तपासणी शिबिर घेऊन बाबा ग्रुप फाऊंडेशनने सामाजिक बांधिलकी जपली आहे.



यावेळी एपेक्स हॉस्पिटल्स मुलुंड आणि आय हॉस्पिटल यांचे शिबिरासाठी सहकार्य लाभले असून, आरोग्य शिबिरात एक्स-रे, चष्मे, मेडिसिन , बाबा ग्रुप फाउंडेशनच्या तर्फे मोफत देण्यात आले असून अनेक नागरिकांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. कार्यक्रम यशस्वी कण्यासाठी बाबा ग्रुप फाऊंडेशन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अनिकेत जाधव,खजिनदार हरेश जाधव , सदस्य विकास धनगर, अजय जाधव, ड्रायव्हर संघटना अध्यक्ष जावेद आली,प्रवेश खलिफा,ऋतिक जाधव, प्रकाश गायकवाड, विशाल तांबे, आदित्य जाधव, रोहित जाधव यांनी मेहनत घेतली.

# लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असणाऱ्या श्री मतोबा महाराजांच्या मुर्तीची व दान पेटीची चोरी

## प्रक्रियेसाठी एकसमान कार्यपद्धती निश्चित; ग्रामस्थामध्ये तिव्र संताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी :-लाखो भाविकांचे श्रध्दास्थान व नैताळे कराचे अराद्य दैवत श्री मतोबा महाराज यांच्या मंदीरातुन चांदीच्या तीन किलो वजनाच्या दोन मुर्तीची व दान पेटीची रात्री दोन वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यानी चोरी केली असुन या घटनेमुळे ग्रामस्थामध्ये तिव्र संताप व्यक्त होत असुन जो पर्यंत पोलिस चोरट्याना शोधून कडक शाशन करत नाही तो पर्यंत संपुर्ण नैताळे शहर स्वयम् स्फुर्तीने बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे..

नाशिक -छत्रपती संभाजीनगर महामार्गावर असलेल्या नैताळे ता.निफाड येथे लाखो भाविकांचे श्रध्दास्थान व येथील ग्रामस्थांचे अराद्य दैवत श्री मतोबा महारांचे मंदीर आहेत दरवर्षी पौष पोर्णिमेला येथे अखंड १५ दिवसासाठी यात्रोत्सव भरविला जातो या पंधरा दिवसाच्या कालखंडात लाखो भाविक श्री मतोबा महाराजांच्या चरणी नतमस्तक होतात अशा जागृत देवस्थान असलेल्या मंदिरात रात्री दोन वाजेच्या सुमारास अज्ञात चोरट्यानी मंदिरातील आतील दरवाजाची कुलुप तोडून मंदिरात प्रवेश केला व साधारणतः तीन किलो वजनाच्या चांदीच्या दोन मुर्ती व मंदिरातील दान पेटी चोरुन निली ही संपुर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे सदरची घटना पहाटे पाच वाजता मंदिरातील पुजारी याच्या लक्षात आल्यानंतर घटनेची माहीती श्री मतोबा महाराज देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष नामदेव बोरगुडे व विश्वस्त मंडळास देण्यात आली. देवस्थानचे अध्यक्ष नामदेव बोरगुडे यांनी स्वतः निफाड पोलिस ठाण्यात जाऊन चोरीची तक्रार दाखल केली घटनेचे गांभिर्य लक्षात घेता निफाड पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक गणेश गुरव व टीम घटनास्थळी दाखल झाले घटनेची संपुर्ण माहीती घेऊन प्राथमिक तपासानंतर तातडीने नाशिक येथील श्वान पथकास पाचारण करण्यात आले श्वान पथकास गावाच्या परिसरात व धारणगाव रोड पर्यंत दिशा दाखविण्यात आली त्यानंतर तपासली गती मिळाली नैताळे शहराच्या लगत असलेल्या गोविंदराव भवर यांच्या गट नंबर १६३ मधील शेतात असलेल्या विहीरीत रिकामी दानपेटी सापडली आहे.दरम्यान या घटनेची माहीती मिळाल्याने निफाडचे आमदार दिलीपराव बनकर ,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्याक्ष राजेंद्र डोखळे ,सागर पाटील कुंदे निफाडचे तहसिलदार विशाल नाईकवाडे ,तलाठी शंकर खडांगळे, ग्राम विकास आधिकारी उज्वला भोईर यांनी घटनास्थळी भेट देऊन निफाड पोलिसांशी सवांद साधुन श्री मतोबा महारांच्या मुर्तीचा तपास लवकरात लवकर करुन भाविकांना व ग्रामस्थाना दिलासा द्यावा अशी मागनी करण्यात आली आहे.

### नैताळे ग्रामस्थांच्या भावना समजून घेत, चोरीप्रकरणाचा कसून तपास सुरू

**लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आणि नैताळे गावाचे आराध्य दैवत श्री मतोबा महाराज मंदिरातून चांदीच्या तीन किलो वजनाच्या दोन मूर्ती व दानपेटीची मंगळवारी मध्यरात्री झालेली चोरी ही अत्यंत दुर्दैवी व संतापजनक घटना आहे.आज सकाळी नैताळे येथील नागरिक व निफाड पोलिसांसह घटनास्थळी भेट देऊन संपूर्ण माहिती घेतली. श्वानपथकाच्या मदतीने फुटलेली दानपेटी जवळच्या शेतात सापडली असून लवकरच फॉरेन्सिक टीमही तपासात सामील होत आहे.तपासाची पुढील दिशा पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने सुरू आहे. दोषींना शोधून कडक कारवाई व्हावी यासाठी प्रशासनाशी सातत्याने संपर्कात आहोत. श्रद्धास्थानाचा अवमान सहन केला जाणार नाही तरी ग्रामस्थांनी शांतता राखावी व पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे, अशी विनंती.**

**-आ.दिलीपराव बनकर (निफाड विधानसभा)**





**नैताळेकराचे अराद्य दैवत व लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या श्री मतोबा महाराज मुर्ती चोरी प्रकरणामुळे ग्रामस्थामध्ये तिव्र स्वरुपाचा संताप व्यक्त होत असला तरी ग्रामस्थानी शहर व परिसरात पुर्णपणे शांतता ठेऊन सर्व व्यावसायिकानी स्वयमस्फुर्तीने आज १००% दुकाने बंद ठेऊन घटनेचा निषेध केला आहे व पोलिसानी तातडीने तपास करावा अशी सर्व ग्रामस्थांची मागनी आहे**

**- राजेंद्र बोरगुडे (संचालक - ला.कृ.बा.समिती)**

# वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी विज्ञान प्रदर्शनाची गरज व आवश्यकता : नारायण वाजे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक जिज्ञासा व वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण करण्यासाठी विज्ञान प्रदर्शनाची गरज व आवश्यकता आहे . विज्ञान प्रदर्शनांमुळे संशोधन वृत्तीस चालना मिळते व त्यातूनच भावी शास्त्रज्ञ तयार होतात असे मत श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नारायण वाजे यांनी केले.

### डुबेरे येथील जनता विद्यालयात शालेय विज्ञान प्रदर्शन उत्साहात

मराठा विद्या प्रसारक समाज संचलीत डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शालेय विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरून श्री.वाजे बोलत होते . व्यासपीठावर माजी सरपंच रामनाथ पावसे, मुख्याध्यापक रंगनाथ उगले,पर्यवेक्षिका जयश्री पगारे ,जेष्ठ शिक्षक सोमनाथ गिरी , रामदास वारुंगसे,कचेश्वर शिंदे,मारुती डगळे, विष्णू पवार आदी उपस्थित होते . मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे तालुका संचालक कृष्णाजी भगत यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विज्ञान आयोजित करण्यात आले.

आपल्या प्रास्तविकात मुख्याध्यापक रंगनाथ उगले यांनी विज्ञान प्रदर्शनाचा हेतू स्पष्ट करून संकल्पना व विचार प्रत्यक्षात उतरवण्यासाठी विज्ञान प्रदर्शनाची गरज असल्याचे सांगितले .परीक्षक प्राजक्ता दशपुते ,रेवणनाथ कांगणे यांनी मनोगत व्यक्त केले. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन नारायण वाजे तर वैज्ञानिक रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन सरपंच रामनाथ पावसे यांच्या हस्ते करण्यात आले.इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक संकल्पना विविध उपकरणाच्या माध्यमातून स्पष्ट केल्या.विद्यार्थ्यांनी सौर ऊर्जा, आधुनिक शेती, दळणवळण, पर्यावरण, प्रदूषण आदींसह विविध विषयांवर उपकरणे व प्रतिकृती तयार केल्या. प्राथमिक गटात ४० तर माध्यमिक गटात ३५ असे मिळून ७५ उपकरणे विद्यार्थ्यांनी तयार केली. रांगोळी स्पर्धेतुन वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट केल्या. मुलींनी २० वैज्ञानिक रांगोळ्या काढल्या.विद्यार्थ्यांनी आपली कला रांगोळीच्या माध्यमातून दाखवून दिली. नाशिक येथील रमाबाई आंबेडकर विद्यालयाच्या विज्ञानशिक्षिका प्राजक्ता दशपुते यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.सूत्रसंचालन राजश्री बोडके यांनी तर आभार शालेय विज्ञान समितीचे प्रमुख डी.ए. रबडे यांनी केले. डी.ए. रबडे,विज्ञान छंद मंडळ प्रमुख रेवणनाथ कांगणे, योगिता गायधनी, सिद्दी आहेर,रेखा खंडीझोड, सुनिल ससाणे आदींसह विद्यार्थी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# अक्कलकोटमध्ये तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा यशस्वी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : गुरुवारी, येथील फतेहसिंहा क्रीडांगण मध्ये पंचायत समिती शिक्षण विभागाने आयोजित केलेल्या लहान गट प्राथमिक शाळेतील मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धा अतिशय यशस्वीरित्या पार पडल्या.

सकाळी, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांनी क्रीडांगण चे पूजा करून क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन केले आणि तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आवश्यक असलेली सर्व तयारी करण्यात आली आहे.

क्रीडा शिक्षकांनी कोणत्याही वादविवादांशिवाय स्पर्धा यशस्वी कराव्यात, विद्यार्थ्यांनीही दृढनिश्चयाने खेळ खेळावा आणि आपल्या शाळेचे आणि तालुक्याचे नाव उंचावे. त्यांनी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी जाणाऱ्या संघाला शुभेच्छा दिल्या आणि संपूर्ण दिवस खेळाच्या मैदानावर उभे राहिले आणि शेवटी विजेत्या संघाला स्मृतिचिन्हे आणि प्रमाणपत्रे देऊन सन्मानित केले. क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी विस्ताराधिकारी अधिकारी सोमशेखर स्वामी यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नियोजन करून स्पर्धा यशस्वी केले. दिवसभर संघांनी चांगला खेळ केला. तालुका हायस्कूलच्या क्रीडा शिक्षकांनी पंच म्हणून काम केले.

क्रीडा स्पर्धा यशस्वी करण्यासाठी तालुक्यातील केंद्रप्रमुखनी सहकार्य केले. प्रशांत अरबाळे यांच्या उत्तम नियोजनामुळे क्रीडा स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली. ६ डिसेंबर रोजी ह्याच मैदानात मोठा गटाचे मुले आणि मुलींचे क्रीडा स्पर्धा होणार आहेत.

१०० मीटर, २०० मीटर आणि बुद्धिबळ हे वैयक्तिक खेळ , तर लंगडी , खो-खो आणि कबड्डी हे सामुहिक खेळ होते. विजेत्या आणि उपविजेत्या संघांना स्मृतिचिन्हे, प्रमाणपत्रे देण्यात आली आणि विजेत्यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी जाण्यासाठी पत्रे, वैयक्तिक खेळांमध्ये प्रमाणपत्रे आणि पदके देण्यात आली.

खो-खोमध्ये मराठी सावळा शाळेच्या विद्यार्थ्यांनी पारितोषिक पटकावले, तर मींदरगी कन्नड बॉईज स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उपविजेतेपद पटकावले, तर चौथीचा विद्यार्थी सोमनाथ हसरमनी याने १०० मीटर शर्यतीत तिसरा क्रमांक पटकावला. सर्व पारितोषक विजेत्यांचे शिक्षण विभागातर्फे अभिनंदन करण्यात आले.

शिक्षक नेते वीरभद्र यावाड , बसवराज खिलारी, केंद्रप्रमुख कृष्णत मोरे, देविदास वागमोडे, प्रेमदास राठोड, शिवानंद गोगाव, तुकाराम जाधव, गणेश अंबुरे, विशाल सेटे, अंबाराया उजनी, सुजित पाटील सहित क्रीडाशिक्षक उपस्थित होते. क्रीडा स्पर्धेच्या यशस्वितेसाठी रवी इंगळे, दत्तात्रेय गरड, प्रेमदासा राठोड, अविनाश मोरे, प्रकाश सोनटक्के, बसवराज सक्करगी, दत्तात्रेय सावंत, तुकाराम जाधव, राजकुमार शावरी, समीर कुलकर्णी, यांच्यासह अनेकांनी सहकार्य केले.

क्रीडास्पर्धेत विजेते संघ

लंगडी मुली - मैसलगी कन्नड शाळा, लंगडी मुले - लोहारा वस्ती शाळा करजगी., खोखो :- मुले - विजेती शावळ मराठी शाळा, उपविजेता कन्नड मुलांची शाळा मैंदर्गी , मुली - कोर्से गाव मराठी शाळा., कबड्डी मुले - जेवूर कन्नड शाळा, कबड्डी मुली - चिंचोली (नि.) मराठी शाळा, १०० मीटर धावणे प्रथम आकाश कांबळे बाबलदा कन्नड शाळा. साक्षी जेवूर इब्राहिमपूर मराठी शाळा, २०० मीटर धावणे मुले प्रथम - गुरय्या स्वामी कन्नड शाळा अंकलगे, मुली - सविता खिलारी नागणसुर मराठी शाळा, बुद्धिबळ प्रथम यश बंदिछोडे व लक्ष्मी माळी साफळे मराठी शाळा

# नंगपुरामुर्री निवासी शाळेत परसबागेतून फूलणार बागायती शेती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया/प्रतिनिधी : तालुक्यातील शहराला लागून असलेले नंगपुरामुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा येथे परसबाग तक्रार करण्यात आली. या परसबागेतून नगदी पिकांची शेती लागवड करण्यात आली. लवकरच ही बागायती फुलणार आहेत.



यावेळी शाळेचे मुख्याध्यापक रविशंकर इठूले यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील शिक्षक नीता भलमे, पी. ए. लांजेवार, मुन्नाभाई नंदागवळी, प्रदीप ढवळे, साधना पारधी, आशिष शहारे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर व तुषार महाजन आदी उपस्थित होते.

यावेळी शालेय परिसरात परसबाग तयार करण्यासाठी काळी कसदार माती बोलावून सुंदर सुशोभित परसबाग तयार केली. यामध्ये भाजी पिकात मेथी, लाल भाजी, पालक, कोथिंबीर, चवळी भाजी रोप लावण्यात आले. तसेच वांगी, बटाटे, कांदे, बरमाराक्षस आदीची लागवड करण्यात आली.

### विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद : विविध नगदी पीके लागवड

लागवड करण्यासाठी नीता भलमे, मुन्नाभाई नंदागवळी, संतोष बघेले यांनी श्रीपध्दत लागवड करुन, त्याचे बेड तयार केले गेले. पाणी व मातीचे पांघरूण करण्यात आले.

या शाळेची नवोपक्रम राबविणारी शाळा असा उल्लेख करण्यात येत आहे. शिक्षक सुध्दा नवनवीन उपक्रम राबवून शाळेतील विद्यार्थ्यांचा बौध्दिक, गुणात्मक व शारीरिक विकास करण्यासाठी अतिशय प्रखर भूमिका पार पाडल्या जात आहेत.

### अनधिकृत चार वाहने अडवून दंडात्मक कारवाई

### महसूल प्रशासनाकडून विशेष मोहीम

# निफाड तालुक्यात अवैध गौण खनिज वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभागाची धडक मोहीम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी

निफाड तालुक्यात अवैध गौण खनिज उत्खनन आणि वाहतूक यावर नियंत्रण आणण्या साठी महसूल प्रशासनाकडून विशेष मोहीम राबवण्यात आली. तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने विविध परिसरात गस्त घालत वाहने तपासली. यावेळी खडी व मातीची अवैधरित्या वाहतूक करणारी चार वाहने अडवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या कारवाईमुळे तालुक्यातील अनधिकृत खनिज वाहतूकदारांना खबरदारीचा इशारा मिळाला आहे.







कारवाईदरम्यान हस्तगत करण्यात आलेली वहाने - चेतन भंडारी - MH 15 JW 2787 (हाफ बॉडी डंपर), खडीची अवैध वाहतूक करताना आढळले. वाहन जप्त करून ₹१.१८ लाखांचा दंड आकारण्यात आला.

बाळासाहेब चौधरी - चेसी नंबर MT448832K3G18722 (हायवा) - मातीची परवानगी नसलेली वाहतूक करताना तपासणीदरम्यान उघड झाले. या वाहनावर ₹२.३० लाख दंड ठोठावण्यात आला.

नीरज चोरडिया - MH 15 KJ 9339 (हाफ बॉडी डंपर)- खडी वाहतूक करणारे हे वाहन परवानगीविना असल्याचे आढळले. या वाहनावरही ₹१.१८ लाख दंड आकारण्यात आला.

अब्बास सय्यद - MH 05 4322 (हाफ बॉडी डंपर) अवैध खनिज वाहतूक प्रकरणात ताब्यात घेऊन ₹१.१८ लाख दंड लावण्यात आला. तहसीलदारांच्या पथकाने या कारवाईदरम्यान वाहतुकीची कागदपत्रे, रॉयल्टी पावत्या, परवाने आणि मालाचा तपशील यांची तपासणी केली. नियमबाह्य वाहतूक आढळल्याने संबंधित सर्व वाहने ताब्यात घेण्यात आली. महसूल प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार तालुक्यात वाढत चाललेल्या अवैध खनिज वाहतूक प्रकरणांवर नियंत्रण मिळवणे हे या मोहिमेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. अवैधरित्या खनिज उत्खननामुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान तर होतेच, पण पर्यावरणावरही नकारात्मक परिणाम होत असल्याकडे प्रशासनाचे लक्ष वेधले जात आहे. कारवाईत झालेल्या सहभागी पथका मध्यें विशाल नाईकवाडे,तहसीलदार, निफाड,जयंत लिलके,मंडळ अधिकारी,ज्ञानेश्वर केसरे मंडळ अधिकारी,अश्विनी भोसले मंडळ अधिकारी,अमोल चव्हाण तलाठी,राहुल अहिरे तलाठी,दीपक पवार तलाठी,राहुल भांगरे तलाठी आदींचा समावेश आहे.महसूल विभागाने पुढील काळातही अशा प्रकारच्या मोहीमा सातत्याने राबविण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. तालुक्यात अवैध उत्खनन करणाऱ्यांना कोणतीही सूट दिली जाणार नसून नियमांचे पालन करूनच खनिज वाहतूक करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.